# सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद,सांगली.

मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, सांगली -मिरज रोड पुष्पराज चौक, सांगली
ता.मिरज जि.सांगली पिनकोड -४१६ ४१६ फोन नं.०२३३/२३७२७२५
e-mail-deputyceosangali@gmail.com


वाचले :- १) महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७

२) महाराष्ट्र शासन वित्त विभाग क्र.अनिआ/१००५/सेवा-४ दिनांक ३१.१०.२००५

३) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग क्र. प्रनिम-२००७/प्र.क्र.(४६/०७)१३अ दि.१९.१०.२००७

४) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरकव्ह-२०१२/प्र.क्र.१८६/१२ दि.२८.०२.२०१३.

५) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग क्र. क्र.प्रनिमं-२००७/प्र.क्र. .(४६/०७)१३अ दि.२७.०६.२००८

६) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागक्र. प्रनिम-१२१४/प्र.क्र. .(४६/०७)१३अ दि.०५.०६.२०१४

७) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्र.दिव्यांग-२०१९/प्र.क्र.१४१/आस्था-८ दि.१३.०९.२१

८) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रनिमं-१२२२/प्र.क्र.५४/का १३-अ दि. ०४.०५.२०२२.

९) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण२०२२/प्र.क्र.११/आस्था-८ दि.१५.०५.२०२३

१०) जिल्हा परिषद सांगली कडील सरळसेवा भरती २०२३ गट क जाहिरात ०१/२०२३ दिनांक ०५.०८.२०२३.

११) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.राआधी/४०२४/प्र.क्र.१४/१६-अ दिनांक २५.०१.२०२४.

१२) मा.अवर सचिव महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग यांचेकडील पदभ ३१२४/प्र क्र २५१/आस्था८ दिनांक ११/१२/२०२४ व दिनांक २२/०१/२०२५

१३) सांगली जिल्हा निवड समिती यांनी निवडीने केलेली शिफारस दि ०८/०८/२०२५

१४) या कार्यालयाककडील मंजूर टिपणी दिनांक :- २५/०८/२०२५.

---

जा क्र.साप्रवि/आस्था-१/वशि/ससे/भरती २०२३/५६७६/२०२५
सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद सांगली.
दिनांक :- २६ ऑगस्ट,२०२५.

## आदेश

सरळसेवा भरती २०२३ करीता जिल्हा निवड समिती, सांगली कडून शिफारस केलेल्या खालील उमेदवारांची जिल्हा सेवा (वर्ग-तीन) गट-क सरळसेवेने कनिष्ठ सहाय्यक (लि.) या पदावर वेतनश्रेणी एस-६ ( १९९००-६३२००) या वेतन संरचनेत अधिक नियमानुसार अनुज्ञेय महागाई भत्ता व इतर भत्ते मध्ये नियुक्ती करण्यात येऊन त्यांची पदस्थापना जिल्हा परिषद अंतर्गत त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी रिक्त पदावर करण्यात येत आहे.

| अ. क्र | उमेदवारांचे नांव व मुळ पत्ता | मुळ जातीचा प्रवर्ग | नियुक्तीचा प्रवर्ग | नियुक्तीने पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. रवी महादेव गायकवाड, मु पो बेडग ता.मिरज जि सांगली ४१६४१० | EWS | EWS (अराखीव) | सामान्य प्रशासन विभाग पंचायत समिती तासगाव |
| २ | श्रीमती अर्चना मुरलीधर कुंभार मु.पो.विद्यानगर, सैदापूर, ता.कराड जि.सातारा ४१५१२४ | इ मा व | इ मा व (महिला) | सामान्य प्रशासन विभाग पंचायत समिती कडेगाव |
| ३ | श्रीमती शहिस्ता अब्दूल फकिर मु.पो.कवठेसार ता.शिरोळ जि.कोल्हापूर ४१६१११ | इ मा व | इ मा व (महिला) | सामान्य प्रशासन विभाग पंचायत समिती मिरज. |

नेमणुकीच्या अटी व शर्ती पुढील प्रमाणे.

१) जिल्हा परिषदेची नोकरी सोडणेची झालेस एक महिन्याची आगावू नोटीस दयावी लागेल नाही तर त्यांना एक महिन्याचा पगार इकडे जमा करावा लागेल आणि या अटीनुसार उमेदवाराने नोकरीवर रुजू होणेपुर्वी तसे लेखी लिहून द्यावे लागेल.

२) महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा प्रवेशोत्तर परीक्षा नियम १९८५ अन्वये नेमणूकीच्या दिनांकापासून तीन संधीमध्ये चार वर्षाचे आंत सेवा-प्रवेशोत्तर परीक्षा पास होणे आवश्यक आहे. अन्यथा वेतनवाढ थांबविणेत येईल व जेष्ठता गमवावी लागेल.

३) ही नेमणूक हंगामी स्वरुपाची असून कोणतीही आगावू दखलगिरी न देता अगर कोणतेही कारणे न दाखविता त्यांना नोकरीतून केव्हांही कमी करणेत येईल व त्याबाबतीत त्यांची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.व या अटीनुसार त्यांचेकडून रुजू होण्यापूर्वी लेखी निवेदन घेवून ते त्यांचे सेवापुस्तकांत ठेवणेचे आहे.

४) रुजू तारखेपासून दोन महिन्याचे आंत उमेदवाराने आरोग्य खात्याने ठरवून दिलेल्या वैद्यकीय अधिकारी यांचेकडून स्वखर्चाने जिल्हा परिषदेचे नोकरीत नेमणेस योग्य असले बद्दल शारिरीक पात्रतेचा दाखला त्यांना हजर करावा लागेल. त्यांनी वरील मुदतीत सदरचा दाखला सादर न केलेस अगर ते जिल्हा परिषदेचे नोकरीत नेमणेस अयोग्य ठरलेस त्यांना नोकरीतून ताबडतोब कमी करणेत येईल.सदरचा दाखला सेवापुस्तकांत जोडणेत यावा.

५) महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील क्र. २० नुसार ज्यांची पत्नी हयात आहे अशा जिल्हा परिषद कर्मचा-यांस दुसरा विवाह करता येणार नाही . महिला कर्मचा-यांना ज्याची पत्नी हयात आहे. अशा पुरुषाशी विवाह करता येणार नाही. उमेदवाराने हजर होताच त्यांचेकडून भारत सरकार व भारताची घटना याविषयी एकनिष्ठ राहीन अशा आशयाचे प्रतिज्ञापत्र ठराविक नमुन्यांत भरून घेऊन ते त्यांचे सेवापुस्तकांमध्ये जोडावे.

६) वरील उमेदवाराची नेमणूक ही पोलीस खातेमार्फत त्या उमेदवाराच्या पूर्व चरित्र व चारित्र्य याबाबतचा दाखला येण्याचे अटीवर केली असून याबाबत पोलीस खातेकडून प्रतिकुल शेरा आलेस त्यांना नोकरीतून ताबडतोब कमी करणेत येईल .

७) शासना कडून आकृतीबंध कोणत्याही कारणास्तव पद संख्या कमी अथवा व्यपगत झालेस सेवेने कनिष्ठ कर्मचाऱ्याला नोकरीतून कमी करणेत येईल याबाबत सदर पदावर कोणत्याही प्रकारचा हक्क सांगता येणार नाही अथवा दावा दाखल करता येणार नाही उमेदवारांनी नोकरीवर रुजू होणेपूर्वी तसे लिहून द्यावे लागेल.

८) प्रस्तुत उमेदवार हे नोकरीवर रुजू झालेनंतर त्यांना प्रथम पगार आदा करताना प्रस्तुत उमेदवार हे नेमणूक नियमानुसार शैक्षणिक पात्रतेनुसार लायक असलेबाबतचा जरुर तो दाखला त्यांचे प्रथम पगार पत्रकात न चुकता दाखल करणेचा आहे.

९) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय एसआरव्ही २०२३/प्र.क्र.१/कार्यासन १२ दिनांक १२ जानेवारी २०२३ नुसार मराठी/इंग्रजी भाषेची टंकलेखनाचे विहीत गतीचे शासकिय वाणिज्य प्रमाणपत्र, दोन वर्षाचे आत सादर करणे बंधनकारक राहिल अन्यथा अनुकंपा तत्वावर दिलेली वर्ग-३ च्या पदावरील नियुक्ती संपुष्टात येईल.

१०) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक २५ जानेवारी १९९९ च्या अधिसूचनेनुसार व सामान्य प्रशासनविभागाकडील शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण/२०००/प्र.क्र.५/२००१/३९ दिनांक २० जुलै २००२ मधील पॅरा.क्र.३ मधील(३) अन्वये वरीलपैकी ज्या कर्मचा-याचे वय सदर आदेशाच्या दिनांकास ५० वर्षे पुर्ण पेक्षा कमी आहे. अशा कर्मचा-यांस संगणक एम.एस.सी.आय.टी. परिक्षा हजर दिनांकापासून दोन वर्षाच्या आंत पास होणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची सेवा संपुष्टात येईल.

११) महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाकडील शासन निर्णय क्रमांक अंनियो १००५/१२६/सेवा ४ दिनांक ३१/१०/२००५ अन्वये लागू करणेत आलेली १ नोव्हेंबर २००५ नंतर शासकीय सेवेत नियुक्ती होणेऱ्या कर्मचाऱ्यास नविन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू राहील. मात्र सद्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना (म्हणजे म.ना.से.(निवृत्ती वेतन) निमय १९८२ व म.ना.से.(निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) निमय १९८४ आणि सद्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भ.नि.नि. योजना त्यांना लागू राहणार नाही. त्यानुसार प्रस्तूत उमेदवारास नियुक्ती झालेस जरुर ती कार्यवाही अवलंबिणेत येईल.तसेच शासन स्तरावरुन वेळोवेळी निर्गमित होणारे शासन निर्णय लागू राहतील.

१२) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.डिमाप१९७६-२८ दिनांक १० जून १९७६ , सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक मभाप-१०८७/१४/सीआर-२/८७/२०, दिनांक ३० डिंसेबर १९८७ आणि सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रमांक/मभाप-२००१/प्र.क्र.६८-२००१-२०-ब दिनांक २५ सप्टेंबर २००१ अन्वंये कर्मचारी यांना एतदर्थ मंडळाच्या मराठी भाषा परिक्षा तसेच हिंदी भाषा परिक्षा (निम्नस्तर/उच्चस्तर) टप्पा टप्प्याने उतीर्ण होणे अगर त्यामधुन सुट घेणे बंधनकारक आहे.

१३) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक बीसीसी /२०११/प्र.क्र .१०६४/२०११ /१६ - ब दि.१२ डिसेंबर २०११ प्रमाणे सदर उमेदवारांनी त्यांचे हजर दिनांकापासून सहा महिनेचे आत जात वैद्यता पडताळणी प्रमाणपत्र सादर करणेचे आहे. जात वैद्यता पडताळणी प्रमाणपत्र विहीत मर्यादेत प्राप्त झाले नाही अथवा सदर प्रमाणपत्र अवैद्य ठरविण्यात आले तर ते नोकरीतून कार्यमुक्त करणेस पात्र ठरतील.

१४) संबंधित उमेदवारांने नियुक्तीचे ठिकाणी मुख्यालय वास्तव्य करणे बंधनकारक राहील.

१५) उमेदवार सांगली जिल्हा परिषदेच्या अधिनस्त जिल्हयातील कोणत्याही कार्यालयाअंतर्गत बदलीस पात्र राहील.

१६) उमेदवारास महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय दिनांक २८ मार्च, २००५ आणि शासन परिपत्रक दिनांक ०१ जुलै, २००५ मधील नमूद महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधील तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील. व सेवा कालावधीमध्ये मर्यादीत कुंटूबाचे उल्लघंन केल्यास सेवा करणेस अपात्र ठरविणेत येईल.

१७) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक वशिअ/१२१४/प्र.क्र.२६/११ दिनांक २ जून २०१४ नुसार संबंधित उमेदवारांने प्रथम नियुक्तीचे वेळी नुियक्तीच्या दिनांकापासून दोन महिन्याचे कालावधीत त्यांची स्वत:ची मक्ता व दायित्वे या बद्दलची विवरणे प्रपत्र १ , २ व ३ या एकूण ३ प्रपत्रामध्ये (म्हणजे :- (अ) अचल मालमत्तेचे विवरणपत्र (ब) चल मालमत्तचे विवरण पत्र आणि (क) कर्ज व इतर दायित्वे याबद्दलचे विवरणपत्र ) कार्यालयास सादर करणेचे आहे. तसेच यानंतर प्रत्येक वर्षी त्या त्या वर्षाच्या ३१ मार्चच्या स्थितीत अनुसरुन ३१ मे अखेर सादर करणे बंधनकारक राहील.

१८) सदर आदेशाने नियुक्ती दिल्यानंतर संबंधिताचे नियुक्तीबाबत कोणी आक्षेप घेतल्यास व प्राथमिक चौकशी अंती त्यात तथ्य दिसून आल्यास अगर नियुक्तीचे वेळी / नियुक्तीसाठी सादर केलेले माहिती व त्या अनुषंगीक शैक्षणिक व इतर कागदपत्रे चुकीची आढळून आल्यास नियुक्ती कोणत्याही टप्पावर व कोणत्याही वेळी रद्द करणेत येईल.

१९) सदर आदेशातील जे उमेदवार मागासवर्गीय प्रवर्गातुन असुन त्यांना मागासप्रवर्गात रिक्त पद उपलब्ध नसलेने त्यांना खुल्या प्रवर्गातुन नियुक्ती देणेत आलेली आहे अशा उमेदवारांना त्यांच्या मूळ जात प्रवर्गातील बिंदू रिक्त होताच त्यांना मुळ बिंदुवरती समायोजित करणेत येईल.

२०) संदर्भ क्रं १२ अन्वये माजी सैनिक आरक्षणांतर्गत सुयोग्य उमेदवार उपलबध न झाल्यास सदर पदांचा अनुशेष न ठेवता अनुसूचीत जमाती (अराखीव) मधून नियुक्ती देणेत आली आहे.

२१) सदर आदेशाची अंमलबजावणी सत्वर होणेची असून नेमणूकीचे ठिकाणी सात दिवसाचे आत हजर होणेचे आहे. यात कसूर झालेस त्यांची नेमणूक आपोआप रद्द झालेचे समजणेत येईल.

(तृप्ती धोडमिसे)भा.प्र.से.
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,सांगली.

प्रति:- श्री / श्रीमती-----------------------------------------------यांना

प्रतिलिपी माहितीसाठी व जरुर त्या कार्यवाहीसाठी.

१) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा/ग्राप/बाक) जिल्हा परिषद सांगली
२) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली.
३) खाते प्रमुख,(सर्व) ---------------------------- जिल्हा परिषद सांगली
४) गटविकास अधिकारी, पंचायत समिती, (सर्व)
५) खाते प्रमुख (सर्व)---------------------- पंचायत समिती------------(सर्व)
६) वैद्यकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, --------------------